महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ३ रा दिनांक : २२/१२/२०२५ वार : सोमवार

## सत्ताधारी पक्षांचा विजय निवडणूक आयोगाच्या आशिर्वादाने हर्षवर्धन सपकाळांचा हल्लाबोल



**मुंबई** : नगरपालिका, नगरपरिषद निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाचा गलथान कारभार अधिरेखीत झाला आहे. मतदार प्रक्रियेचा पुरता गोंधळ घातला गेला, तारिख पे तारिख चा खेळ केला. ही निवडणूक फ्रि अँड फेअर अशी झाली नाही. सत्ताधारी पक्षाकडून साम, दाम, दंड, भेद या नितीचा मुक्तपणे वापर करण्यात आला. निवडणुकीत बोगस मतदार, दडपशाही, सत्तेचा गैरवापर आणि पैशाचा प्रचंड वापर पहायला मिळाला. सत्ताधारी पक्षांच्या विजयात निवडणूक आयोगाची मदत सर्वात महत्वाची ठरली आहे, अशी प्रतिक्रीया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

निवडणूक निकालावर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भाजपा महायुती सरकारच्या कामावर जनता प्रचंड नाराज आहे. भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात बोकळला आहे, जनतेची कामं होत नाहीत, अशा परिस्थितीत आज आलेले निकाल जनतेचा कौल वाटत नाही. लोकशाही व संविधानाची पायमल्ली करत खुलेआमपणे दडपशाही करण्यात आली. निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुले बनले आहे. निवडणूक आयोगाचा गोंधळी कारभार व सत्ताधारी पक्षांचा पैसा फेक तमाशा देख, हा खेळ या निवडणुकीत पहायला मिळाला. या सर्व पार्श्वभूमीमुळे काँग्रेस पक्षाला अपेक्षित यश मिळालेले नाही. काँग्रेसला अपेक्षित यश मिळाले नसले तरी काँग्रेस पक्ष लोकशाही व संविधान रक्षणासाठी संघर्ष करत राहिल, आमची ही वैचारिक लढाई आहे असे सपकाळ म्हणाले.

नगरपालिका निवडणुकीत भाजपाला मिळालेले यश हे एकनाथ शिंदेंची शिवसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी धोक्याची घंटा आहे. शत प्रतिशत भाजपासाठी या दोन मित्रपक्षांना भाजपा बाहेरचा रस्ता दाखवेल, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## तरुण नेतृत्वाचा उदय; नगरपालिका निवडणुकीत युवाशक्तीचा मोठा डंका



**सोलापूर** : जिल्ह्याच्या मोहोळ नगरपरिषदेच्या अटीतटीच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने भारतीय जनता पक्षाला जबरदस्त धक्का दिला आहे. शिवसेनेच्या उमेदवार सिद्धी वस्त्रे यांनी भाजपच्या उमेदवार शीतल क्षीरसागर यांचा पराभव करत नगराध्यक्ष पदावर कब्जा केला. विशेष म्हणजे, अवघ्या २२ व्या वर्षी ही किमया साधणाऱ्या सिद्धी वस्त्रे या राज्यातील सर्वात तरुण महिला नगराध्यक्ष ठरल्या आहेत. तर बुलढाणा येथील सिंदखेडराजा नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सौरभ तायडे हे सर्वात कमी वयाचे नगराध्यक्ष ठरले आहेत.
मोहोळ हा भाजपचा आणि विशेषतः माजी आमदार राजन पाटील यांचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र, या निवडणुकीत शिवसेनेने या बालेकिल्ल्याला मोठे खिंडार पाडले आहे. सिद्धी वस्त्रे यांनी भाजपच्या शीतल क्षीरसागर यांचा १७० मतांच्या फरकाने पराभव केला. या निकालाने सोलापूर जिल्ह्यातील भाजपच्या गोटात कमालीची अस्वस्थता पसरली आहे. नगराध्यक्ष पदासोबतच नगरपरिषदेच्या एकूण २० जागांपैकी ९ जागांवर शिवसेनेने विजय मिळवत आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे.

विजयानंतर माध्यमांशी संवाद साधताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष सिद्धी वस्त्रे भावूक झाल्या होत्या. त्या म्हणाल्या की, हा विजय म्हणजे मोहोळच्या जनतेने माझ्यावर टाकलेली मोठी जबाबदारी आणि दाखवलेला विश्वास आहे. निवडणूक प्रचारादरम्यान माझ्या वयावरून आणि अनुभवावरून माझ्यावर अनेक टीका करण्यात आल्या. मात्र, आजच्या निकालाने त्या सर्व टीकेला चोख उत्तर दिले आहे. आता राजकारण बाजूला ठेवून शहराचा विकास आणि जनतेच्या समस्या सोडवणे हीच माझी प्राथमिकता असेल.

दरम्यान, सिंदखेड राजा नगर परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे सौरभ तायडे हे सर्वात कमी वयाचे नगराध्यक्ष ठरले आहेत. त्यांचे वय २१ वर्षे १० महीने आहे. युवा उमेदवार सौरभ विजय तायडे यांनी अवघ्या १६९ मतांच्या फरकाने विजय मिळवला. ते सर्वात कमी वयाचे नगराध्यक्ष ठरले आहेत.

## विदर्भात भाजपला धक्का! : बाळापुरात काँग्रेसची ५० वर्षांनंतर ऐतिहासिक मुसंडी



**नागपूर** : विदर्भातील नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत आज लागलेल्या निकालांनी राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडवून दिली आहे. अकोला जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाने 'चौकार' मारत वर्चस्व राखले असले, तरी बाळापुरात काँग्रेसने 50 वर्षांची प्रस्थापित सत्ता उलथवून लावली आहे. नागपूर जिल्ह्यात काँग्रेसचे खासदार श्यामकुमार बर्वे आणि ज्येष्ठ नेते सुनील केदार यांना त्यांच्याच बालेकिल्ल्यात मतदारांनी मोठा धक्का दिला आहे.

अकोला जिल्ह्यातील सहा नगरपरिषद आणि नगरपंचायतींपैकी चार ठिकाणी भाजपने नगराध्यक्षपदावर कब्जा मिळवला आहे. अकोटमध्ये भाजपने सलग तिसऱ्यांदा आपली सत्ता राखली असून, माया धुळे ५,२७१ मतांच्या मोठ्या फरकाने विजयी झाल्या आहेत. तेल्हारा येथे वैशाली पालीवाल तर मूर्तिजापूरमध्येही भाजपचेच कमळ फुलले आहे. विशेष म्हणजे, पहिल्यांदाच निवडणूक झालेल्या हिवरखेड नगरपंचायतीत भाजपने सुलभा रमेश दुतोंडे यांच्या रूपाने आपला पहिला नगराध्यक्ष निवडून आणत ऐतिहासिक झेंडा फडकवला आहे.
दुसरीकडे, बाळापूर नगरपरिषदेत काँग्रेसने मोठा चमत्कार घडवला आहे. स्थानिक आघाडीचे माजी आमदार नातीकोद्दीन खतीम यांच्या तब्बल ५० वर्षांच्या सत्तेला सुरुंग लावत काँग्रेसच्या उमेदवार डॉ. आफरिन यांनी नगराध्यक्षपदी विजय मिळवला. बार्शी टाकळीमध्ये मात्र वंचित बहुजन आघाडीने आपली पकड कायम ठेवली असून, अख्तर खातून अलीमोद्दीन नगराध्यक्षपदी निवडून आल्या आहेत. या ठिकाणी नगरसेवक पदावरही वंचितच्या उमेदवारांनी मोठ्या प्रमाणावर विजय मिळवला आहे.

नागपूर जिल्ह्यात महायुतीने काँग्रेसच्या दोन मोठ्या नेत्यांना त्यांच्याच गावात धूळ चारली आहे. खासदार श्यामकुमार बर्वे यांच्या कांद्री कन्हान नगरपंचायतीत भाजपचे सुजित पानतावने विजयी झाले. बर्वेंच्या स्वतःच्या प्रभागातही भाजपची महिला उमेदवार निवडून आल्याने हा काँग्रेससाठी मोठा मानहानिकारक पराभव मानला जात आहे. सावनेरमध्ये आमदार आशिष देशमुख यांच्या रणनीतीमुळे सुनील केदार यांना मोठा धक्का बसला. केदार यांच्या मूळ गावात काँग्रेसला भोपळाही फोडता आला नाही आणि भाजपच्या संजना मंगळे नगराध्यक्षपदी विजयी झाल्या.
वर्धा जिल्ह्यातही सत्ताधारी भाजपला संमिश्र फटका बसला आहे. देवळीमध्ये माजी खासदार रामदास तडस यांच्या पत्नी शोभा तडस यांचा अपक्ष उमेदवार किरण ठाकरे यांनी २,१०० मतांनी पराभव केला. तर वर्धा शहरात पालकमंत्री पंकज भोयर यांचे निकटवर्तीय निलेश किटे यांना काँग्रेसचे सुधीर पांगुळ यांच्याकडून पराभवाचा सामना करावा लागला.

चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरीचा गड अभेद्य राखला आहे. २३ पैकी तब्बल २१ जागांवर काँग्रेसचे नगरसेवक निवडून आले असून, वडेट्टीवारांनी आपला राजकीय प्रभाव पुन्हा एकदा सिद्ध केला आहे.
बुलढाणा जिल्ह्याने राज्याला सर्वात तरुण नगराध्यक्ष दिला आहे. सिंदखेड राजा नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे अवघ्या २१ वर्षे १० महिने वयाचे सौरभ विजय तायडे यांनी विजय मिळवला आहे. त्यांनी १६९ मतांच्या फरकाने हा विजय खेचून आणला.
दरम्यान, मेहकरमध्ये शिवसेना शिंदे गटाचे खासदार प्रतापराव जाधव यांना धक्का बसला असून, ही जागा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने जिंकली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ डिसेंबर २०२५


# जिंतूर नगरपालिकेत भाजपाला दणदणीत बहुमत




**जिंतूर प्रतिनिधी / बी.डी. रामपूरकर :** जिंतूर नगरपरिषदेच्या आज झालेल्या २५ नगरसेवक व नगराध्यक्ष अशी निवडणूक होऊन त्यात आज झालेल्या निवडणुक निकालातून मतदारांनी भाजपाचे एक अध्यक्ष तर १६ नगरसेवक बहुमताने व दणदणीत विजयासह निवडून दिले. आज असे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाहीर केले.जिंतूर नगरपरिषदेचे निवडणूक म्हणजे प्रतिष्ठेची समजली जात होती. त्यात तिरंगी लढतीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तर भाजपा अशी चुरशीची लढत होऊन आज दिनांक २१ डिसेंबर रोजी जाहीर निकाल जाहीर होऊन २५ पैकी १६ नगरसेवकासह नगराध्यक्ष म्हणून प्रताप भैया देशमुख यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेसच्या साबिया बेगम कपिल फारुकी यांच्यापेक्षा ३१६७ मतांनी दणदणीत विजय होऊन विजयी झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.तशीच या निवडणुकीत राष्ट्रवादी ला पाच नगरसेवक पद व काँग्रेसला चार नगरा नगरसेवक पदावर समाधान मानावे लागलेले असून आमदार तथा पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर साकोरे यांनी दादाशरीफ चौक येथे मतदारांनी विश्वास टाकला त्याबद्दल सर्वांचे आभार मानले तर त्या पुढे म्हणाल्या की प्रचारादरम्यान मी जो शब्द दिला होता तो सर्व शब्द पूर्ण करणारा असून या जिंतूर शहराला बारामती पेक्षाही चांगले शहर बनवण्याचे स्वप्न पूर्ण करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले त्याचबरोबर नूतन नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांनी शहरांच्या विकासासाठी प्रामाणिक काम करणार असल्याचे सांगून मतदारांची ईश्वर सेवा म्हणून काम करेल अशी ग्वाही दिली .ही निवडणूक दोन डिसेंबरला झालेल्या मतदानाचा निकाल राखून २१ डिसेंबर रोजी सर्व निकाल निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाहीर केला. त्यामध्ये विजयी उमेदवार नगराध्यक्षपदासाठी प्रताप भैय्या देशमुख यांना १३,१२२ तर प्रतिस्पर्धी राष्ट्रवादीचे उमेदवार साबीया बेगम फारुकी यांना ९९५५ अशी मतदान मिळाल्याने नगराध्यक्ष पदासाठी प्रताप देशमुख यांना ३१६७ मतांनी त्यांचा विजय निश्चित झाला तर काँग्रेसचे प्रतिस्पर्धी शेख इस्माईल यांना ६ २९२ यांना मते मिळाले.

# ५० वर्षांनंतर इतिहासाची पुनरावृत्ती; मुरूममध्ये भाजपचा दणदणीत विजय



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी मतदान प्रक्रिया मंगळवार (ता. २) रोजी पार पडली होती. निकाल मात्र लांबणीवर गेला अखेर रविवारी (ता.२१) रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडली. नगरपालिकेत काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून पाटील परिवाराची ५० वर्षापासून एकहाती सत्ता राहिली. यंदाही मुरूम नगरपरिषदेवर प्रथमच भारतीय जनता पार्टीचे कमळ फुलले. पुन्हा एकदा इतिहासाची पुनरावृत्ती करत पाटील परिवाराने एकहाती सत्ता कायम ठेवून ऐतिहासिक वर्चस्व प्रस्थापित केले. ही निवडणूक स्थानिक पातळीवर असल्याने या निवडणुकीत पक्ष नव्हे तर पाटील परिवारावर जनतेचे प्रेम असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध होऊन मतदारांनी विजयी केले. पारंपारीक विरोधकांने एकहाती सत्तेचा बुरुज हलवीण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले. जनतेने मात्र त्यांच्या विचाराला नाकारून कमळ फुलवत मतदानरुपी लोकशाहीचा गुलाल पाटील परिवाराला लावून लोकशाहीच्या आढून जनतेचा विश्वास घात करणाऱ्या विरोधकांला मतदानातून मतदारांनी चांगलाच धडा शिकविला. माजी मंत्री तथा भाजप लातूर ग्रामीण चे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार बापूराव पाटील, भाजप युवानेते शरण पाटील, सौ. संपदा शरण पाटील, स्मिताताई बापूराव पाटील व सर्व उमेदवार यांनी प्रत्येक प्रभागात घेतलेल्या कॉर्नर बैठका, प्रचार पदयात्रा आणि त्यामध्ये मिळत असलेला नागरिकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद म्हणजे विजयी संदेश देत होते. फक्त निकडणुकीची औपचारिकता बाकी राहिली होती. अखेर तो दिवस उजाडला २१ डिसेंबरला. ३० नोव्हेंबर रोजी शहरातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा बसवेश्वर चौक मार्गे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकापर्यंत निघालेल्या पदयात्रेला उसळलेला जनसागर पुन्हा एकहाती सत्तेची साक्षी देत होते. नंतर साठे चौकात माजी मंत्री बसवराज पाटील, जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, नितीन काळे सह उपस्थित मान्यवरांच्या पार पडलेल्या विराट सभेत बसवराज पाटील यांनी मुरूमकरांना केलेल्या संभाषणाने विजयावर शिक्कामोर्तब झाला. विरोधकांवर टीका-टिप्पणी करण्यापेक्षा आपण भविष्यात नगरपरिषदेच्या माध्यमातून जो वचननामा निवडणुकीत जनतेसमोर मांडून येणाऱ्या काळात विकासात्मक काम करण्याचा संकल्प अधोरेखित केला. या सभेपासूनच मतदारांना कळले की उच्च विचाराचे राजकारण काय असते. इथूनच मतदारांचे मतपरिवर्तन झाले. पाटील परिवाराच्या माध्यमातून सर्व धार्मियांना मुरूम नगरपरिषदेवर ५० वर्षे कै. माधवराव (काका) पाटील यांच्या हयातीत आणि त्यांच्या पश्चात बसवराज पाटील, बापूराव पाटील यांनी संधी दिली. मात्र या निवडणुकीत पाटील परिवारातील बापूराव पाटील नगराध्यक्ष पदाचे उमेदवार होते. यावेळी मतदारांनी उत्स्फूर्तपणे बापूराव पाटलांचा प्रचार करत विजयाची माळ त्यांच्या गळ्यात घातली. विजयी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बापूराव पाटील यांनी प्रतिस्पर्धी अजित चौधरी यांच्यापेक्षा ४०१९ मताच्या फरकाने विजय मिळविला. या निवडणुकीतील प्रभागनिहाय विजयी उमेदवार खालील प्रमाणे... प्रभाग एक-अ व ब : स्नेहा राम बंडगर (७२८ मतांनी विजयी), अमर धनराज भोसले (५३६ मतांनी विजयी), प्रभाग दोन-अ व ब : सचिन गुलाब फनेपुरे (३११ मतांनी विजयी), श्रीदेवी नागप्पा दुर्गे (३९२ मतांनी विजयी), प्रभाग तीन-अ व ब : महादेवी बबन बनसोडे (३१३ मतांनी विजयी), अहमद युनूज मनियार (२४३ मतांनी विजयी), प्रभाग चार-अ व ब अंकिता राजकुमार अंबुसे (६७० मतांनी विजयी),निरजानंद सच्चिदानंद अंबर (६९१ मतांनी विजयी), प्रभाग पाच-अ व ब : गौस रशीद शेख (२१० मतांनी विजयी), निर्मला प्रकाश कंटेकुरे (४७१ मतांनी विजयी), प्रभाग सहा-अ व ब : रूपचंद गुंडेराव गायकवाड (२५२ मतांनी विजयी), मुमताजबी मलंग ढोबळे (२०० मतांनी विजयी), प्रभाग सात-अ व ब : ज्योती सुजित शेळके (३४८ मतांनी विजयी), रमेश दत्तू चव्हाण (१७२ मतांनी विजयी), प्रभाग आठ-अ व ब : सुनिता मारुती बनणे (५५८ मतांनी विजयी), राजेंद्र संभाजी बेंडकाळे (५१२ मतांनी विजय), प्रभाग नऊ-अ व ब : समीना राजाबकसर मुल्ला (१३५ मतांनी विजयी), अजितकुमार अरविंद चौधरी (९ मतांनी विजयी), प्रभाग दहा-अ व ब : रागिनी भारत गायकवाड (३४६ मतांनी विजयी), सिद्राय्या सायबण्णा ख्याडे (५२२ मतांनी विजयी). मुरूम शहरातील नगरपरिषद निवडणुकीमध्ये नगरसेवक पदाकरिता सर्वात जास्त मतांनी निरजानंद सच्चिदानंद अंबर ६९१ मतांनी विजयी तर सर्वात कमी मतांनी अजितकुमार अरविंद चौधरी ९ मतांनी विजयी झाले. पाटील परिवारातून एक व्यक्ती शहराच्या सेवेसाठी सक्रिय होतो आहे. यात गैर काय ? असा सवाल मतदारांमध्ये निर्माण झाला होता मात्र मतदारांनी पाटील परिवारावर विश्वास दाखवून आपल्याच कुटुंबातील सदस्य असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले. मतदारांनी विरोधकांच्या विचाराला नाकारले आणि कमळ फुलविले. पाटील परिवाराने काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून मुरूम नगरपरिषदेवर रचलेले ऐतिहासिक रेकॉर्ड पुन्हा एकदा पाटील परिवारानेच भाजपच्या माध्यमातून एकहाती सत्ता काबीज करून वर्चस्व सिद्ध केले. मुरूम शहरात पक्षाला नव्हे, पाटील परिवाराला पाहून मतदान होते. हे पुन्हा एकदा जनतेने सिद्ध करून जलवा कायम राखला. मतमोजणी प्रसंगी प्रशासकीय व पोलीस यंत्रणा सज्ज होती.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ डिसेंबर २०२५


## गुणवान होणे हिच खरी कमाई : डॉ. प्रभाकर शेळके



**जालना** : जिल्ह्यातील मठपिंपळगाव येथील मत्स्योदरी विद्यालयात संस्कार दिनानिमित्त प्रमुख व्याख्याते म्हणून ग्रामीण कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके बोलताना म्हणाले "आजचा विद्यार्थी हा मार्कवादी झाला आहे.त्याच्या हातात मोबाईल आला आहे.तो एकलकोंडा होतं चालला आहे. वाचन, लेखन, मनन करतांना तो दिसतं नाही.तो केवळ स्पर्धा करतो आहे. त्याला क्षणात राग येतो आहे. म्हणून चांगल्या संस्काराने तो गुणवंत, कुलवंत, शीलवंत भाग्यवंत झाला तर हिच खरी कमाई आहे." मुख्य संयोजक सहाय्यक प्रशासकीय अधिकारी राहुलजी भालेकर मुख्याध्यापक छगनराव बनकर, बी. आर. रणमळे, प्रितम शिंदे, संभाजी वाघुंडे, या प्रसंगी कश्यपकुमार वाहुळकर, यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## जितो दिल्ली पब्लिक स्कूल आणि गरुडझेप पब्लिक स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन 'अनुगुंज' चा जल्लोष!




**दौलताबाद (जावेद अहमद) :** जितो दिल्ली पब्लिक स्कूल आणि गरुड झेप पब्लिक स्कूलने २० डिसेंबर २०२५ रोजी आपला चौथा वार्षिक स्नेहसंमेलन दिवस मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा केला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी डॉ. संजय सांभाळकर, उपप्राचार्य दगडोजीराव देशमुख महाविद्यालय बजाजनगर वाळूज,प्रमुख पाहुणे सुनील राऊत, एपीआय सुधीर मोटे ,डॉ जीवन राजपूत ,गजानन नांदूरकरयांची उपस्थिती असल्याने पालकांचा आनंद द्विगुणित झाला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलन झाले. स्वागतगीत व रॉक बँड यांचे सादरीकरण झाले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव लौकिक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सावित्री डकरे यांनी शाळेचे अहवाल वाचन केले ; शाळेचे संस्थापक आणि संचालक डॉ. सुरेश सोनवणे यांनी विद्यार्थी व पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले. 'अतुल्य भारत' या थीमवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलनात संगीत आणि नृत्यांचे बहारदार प्रदर्शन होते. प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी 'अतुल्य भारत' या थीमवर आधारित शेती,सण व उत्सव, शिक्षण, खेळ, पर्यटन, तंत्रज्ञान, अध्यात्म, देशभक्ती अशा विविध प्रकारांवर आधारित नृत्यांचे बहारदार प्रदर्शन झाले. या कार्यक्रमासाठी शाळेचे संस्थापक डॉ. सुरेश सोनवणे ,संचालक निलेश सोनवणे , प्राचार्य सावित्री डकरे व मीरा देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले.सर्व शालेय शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## ज्योतिषाचा डाव -"कुंडलीच्या जाळयात अडकलेला शिक्षित समाज."

समाजातील अनेक गर्भगळीत प्रथांमध्ये 'कुंडली' ही सर्वात खोलवर घुसलेली, सर्वात विनाशकारी आणि सर्वात कपटपूर्ण परंपरा मानली जाते.वरकरणी ती 'ज्योतिषशास्त्र', 'गुण- मीलन', 'शुभाशुभ' अशा नावांनी सजवली जाते.परंतु तिचा गाभा केवळ एकच भीती आणि अंधश्रद्धेच्या जोरावर लोकांना कायम गुलाम बनवून ठेवते.कुंडली ही आजही हजारो कुटुंबांच्या सुखाचा गळा दाबणारी एक संस्कृतिक बेडी ठरते आहे.तथाकथित 'ज्योतिषाचार्यांच्या' दुकानांना मात्र दिवसा-रात्री शिक्षित ग्राहकांची रांग वाढतच आहे.हा व्यापार धर्माच्या पडद्यामागे इतक्या चतुराईने लपला आहे की सामान्य माणूस त्याला 'परंपरा' मानतो आणि त्याच परंपरेत स्वतःचे आयुष्य बरबाद करतो.ज्योतिषाने स्वतः काढलेली पत्रिका काही वर्षांनी त्याच्याकडे परत घेऊन गेलो, तरी त्या व्यक्ती जीवंत आहे की मयत आहे हे सुद्धा तो ओळखू शकत नाही.मयत तरुण आणि मयत तरुणी यांची पत्रिका लग्न जुळवण्यासाठी त्याच्याकडे नेली, तरीही तो शुभ मुहूर्त काढूनच देतो.एवढं मोठं थोतांड म्हणजे ही कुंडली आहे!श्रीमत व गरीब घरात "एकाच वेळी" जन्म घेतलेल्या मुलाचे भविष्य वेगवेगळे असते.गरीब घरातील मुलगा जगण्यासाठी संघर्ष करत असतो. तर श्रीमत मुलगा आरामदायी जीवन जगत असत.आजच्या वैज्ञानिक युगातील सर्वात मोठा पराभव म्हणजे शिक्षित समाजही कुंडलीच्या नावाखाली जन्मवेळ, तास, मिनिट, नक्षत्र या हास्यास्पद गोष्टींवर आयुष्याच्या महत्त्वाच्या निर्णयांचा ताळमेळ बसवतो. जन्माच्या वेळी आकाशातील ग्रह तुमचे भविष्य ठरवणार, तुमचे नातेसंबंध मोडणार, तुमचे आरोग्य घालवणार हे सर्व विधानं आजही प्रश्न न विचारताच खरे धरली जातात.समाजशास्त्र आणि मानसशास्त्र सांगते की मनुष्याचे वर्तन, गुण, आवडी, नैतिकता आणि नातेसंबंध ग्रह नव्हे; तर कुटुंब, संस्कार, शिक्षण, समाज, वातावरण आणि स्वतःचे निर्णय ठरवतात.मात्र ज्योतिषशास्त्राचा व्यवसाय चालू ठेवण्यासाठी हा सत्य आवाज नेहमीच दाबला जातो आहे.कुंडलीचा वापर शतकानुशतके विवाह, संपत्ती, नातेसंबंध यांचे मार्ग रोखण्यासाठी केला गेला.काही 'ग्रहदोष', 'मंगळ दोष', 'नाडीदोष' या काल्पनिक भयांनी अनेकांना सामाजिक पातळीवर कमी लेखले गेले.ही प्रथा केवळ अवैज्ञानिक नाही तर निरक्षरता आणि भीतीवर उभा राहिलेला व्यवस्थात्मक अत्याचार आहे.कुंडलीचे भय जितके खोलवर पेरले जाते, तितका ज्योतिषांचा धंदा तेजीत चालतो.जन्मपत्रिका बनवणे, दोष शांती, ग्रहबळी, पूजाअर्चा, रत्न, जप-तप, यज्ञ या सर्वांचा मिळून एक विराट उद्योग उभा आहे.हा उद्योग लोकांच्या भविष्याची नाही, तर अंधश्रद्धेची कमाई सुरक्षित ठेवतो.विज्ञान प्रगत होत असताना, समाज कुठेतरी उलट दिशेने धावत आहे.कुंडलीचा आधार घेऊन होणारी विवाहनिर्णय, करिअर-निवडी, सामाजिक बहिष्कार हे सर्व आजच्या शिक्षित समाजाच्या माथ्यावरचा काळा डाग आहे.ही केवळ एक जुनी प्रथा नाही; तर समाजाच्या तर्कशक्तीवर केलेला दाबलेला हल्ला आहे.आज काळाची मागणी एकच समाजाने कुंडलीचा मुखवटा फाडून वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे.मैत्री, प्रेम, विवाह, भविष्य या सर्वांची किल्ली ग्रहांच्या नव्हे, तर आपण घेतलेल्या निर्णयांच्या हातात आहे.




~ प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे
जालना, मो. 9421319270.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ डिसेंबर २०२५


## गुरु गोविंदसिंह यांचे सामाजिक कार्य

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की, ज्यांचे कार्य केवळ धार्मिक चौकटीत मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनाच्या व्यापक प्रवाहाला दिशा देणारे ठरते. अशाच महान विभूतींपैकी एक म्हणजे गुरु गोविंद सिंह होय. शीख धर्माचे दहावे गुरु म्हणून त्यांची ओळख असली, तरी त्यांचे कार्य हे केवळ धर्मगुरुपदापुरते सीमित नव्हते. ते एक समाजसुधारक, न्यायासाठी लढणारे योद्धा, मानवी मूल्यांचे तत्त्वज्ञ आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य देणारे नेतृत्व होते. त्यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या सामाजिक कार्याचा वेध घेणे म्हणजे भारतीय समाजातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या संघर्षाचा इतिहास समजून घेणे होय.गुरु गोविंद सिंह यांचा काळ हा सामाजिक, धार्मिक आणि राजकीय अस्थैर्याचा होता. समाज जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, धार्मिक असहिष्णुता आणि सत्ताधारी वर्गाच्या अन्यायाने ग्रासलेला होता. सामान्य माणूस भयभीत जीवन जगत होता. धर्माचा वापर माणसामाणसांतील भेद वाढवण्यासाठी केला जात होता. अशा परिस्थितीत गुरु गोविंद सिंह यांनी धर्माला सामाजिक न्यायाचे साधन बनवले. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे कर्मकांड नव्हे, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा आणि मानवतेच्या रक्षणासाठी केलेली कृती होती.गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक कार्याचा केंद्रबिंदू म्हणजे "खालसा पंथ"ची स्थापना. ही घटना केवळ धार्मिक नव्हती, तर ती सामाजिक क्रांतीची सुरुवात होती. खालसा पंथाने जात, वर्ण, जन्माधारित श्रेष्ठत्व आणि सामाजिक भेदभाव यांना ठामपणे नाकारले. खालसा पंथात प्रवेश करताना सर्वांना समान ओळख देण्यात आली. सिंह आणि कौर ही नावे स्वीकारून स्त्री-पुरुषांना समान दर्जा देण्यात आला. या कृतीतून गुरु गोविंद सिंह यांनी स्पष्ट संदेश दिला की, मानवाची ओळख त्याच्या जन्मावर नाही, तर त्याच्या मूल्यांवर आणि कर्तृत्वावर आधारित असावी.स्त्री-पुरुष समानतेचा विचार गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. त्या काळात स्त्रीला समाजात दुय्यम स्थान दिले जात होते. अनेक अमानवी प्रथा आणि रूढी स्त्रीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालत होत्या. गुरु गोविंद सिंह यांनी या अन्यायकारक व्यवस्थेला विरोध केला. खालसा पंथात स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच सन्मान, अधिकार आणि जबाबदाऱ्या दिल्या. स्त्री ही दुर्बल नसून समाजाच्या परिवर्तनाची शक्ती आहे, असा विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मांडला. त्यामुळेच शीख परंपरेत स्त्रीला आत्मसन्मानाचे स्थान मिळाले.गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक विचारात आत्मसन्मान आणि स्वाभिमानाला अनन्यसाधारण महत्त्व होते. त्यांनी आपल्या अनुयायांना गुलामगिरीची मानसिकता झुगारून देण्याचा संदेश दिला. अन्याय सहन करणे हा धर्म नाही, तर अन्यायाला विरोध करणे हेच खरे धार्मिक कर्तव्य आहे, हा विचार त्यांनी समाजात रुजवला. याच विचारातून "संत-सिपाही" ही संकल्पना पुढे आली. मनाने संत असावे, परंतु अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आवश्यक ते धैर्य आणि शक्ती अंगी असावी, असा त्यांचा आग्रह होता. ही संकल्पना सामाजिक न्यायाच्या संघर्षाला नैतिक अधिष्ठान देणारी ठरली.धार्मिक सहिष्णुता आणि मानवता हा गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक कार्याचा आत्मा होता. त्यांनी कोणत्याही एका धर्माला श्रेष्ठ मानले नाही, तर सर्व धर्मांचा आदर करण्याचा संदेश दिला. त्यांच्या लिखाणातून आणि उपदेशातून मानवतेचे सर्वोच्च मूल्य सतत अधोरेखित होते. देवपूजेपेक्षा मानवसेवा श्रेष्ठ आहे, हा विचार त्यांनी समाजात दृढ केला. त्यामुळे शीख धर्म हा केवळ धार्मिक पंथ न राहता मानवी मूल्यांवर आधारित सामाजिक चळवळ बनला.गुरु गोविंद सिंह यांनी शिक्षण आणि विवेकशीलतेलाही सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन मानले. अंधश्रद्धा, रूढीवादी परंपरा आणि अज्ञान यांना त्यांनी समाजाच्या प्रगतीतील मोठे अडथळे मानले. त्यामुळे त्यांनी आपल्या अनुयायांना ज्ञानसंपन्न, विचारशील आणि प्रश्न विचारणारे बनवण्यावर भर दिला. शिक्षण हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नव्हे, तर समाजाच्या नैतिक उन्नतीसाठी आवश्यक आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या विचारांमुळे समाजात विवेकवादी दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली.त्यांच्या सामाजिक कार्यात सेवा आणि त्यागाला अनन्यसाधारण स्थान होते. गुरु गोविंद सिंह यांचे संपूर्ण जीवनच त्यागाचे प्रतीक होते. त्यांनी आपल्या कुटुंबीयांचे, पुत्रांचे बलिदान दिले, तरीही अन्यायापुढे झुकण्यास नकार दिला. हे बलिदान केवळ धार्मिक नव्हते, तर ते मानवी स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आत्मसन्मानासाठी होते. त्यांच्या या त्यागातून समाजाला धैर्य, निष्ठा आणि मूल्यनिष्ठ जीवनाचा आदर्श मिळतो. आजही त्यांचे जीवन सांगते की, सत्य आणि न्यायासाठी दिलेले बलिदान कधीही व्यर्थ जात नाही.गुरु गोविंद सिंह यांचे सामाजिक कार्य हे कालातीत आहे. आजच्या आधुनिक समाजातही जातीय भेदभाव, धार्मिक असहिष्णुता, स्त्री-पुरुष असमानता, सामाजिक अन्याय आणि शोषण विविध स्वरूपांत अस्तित्वात आहेत. अशा वेळी गुरु गोविंद सिंह यांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. समता, बंधुता, न्याय आणि मानवतेवर आधारित समाजनिर्मितीचा त्यांचा संदेश आजच्या पिढीसाठी दिशादर्शक ठरतो.वर्तमानपत्रात त्यांच्या जयंतीनिमित्त प्रसिद्ध होणारा लेख हा केवळ इतिहासाची उजळणी नसून समाजाला आत्मपरीक्षण करण्याची संधी देणारा असतो. गुरु गोविंद सिंह यांनी दिलेला सामाजिक संदेश आपल्याला सांगतो की, धर्म हा माणसामाणसांमध्ये भिंती उभ्या करण्यासाठी नसून, त्या भिंती पाडण्यासाठी असावा. शक्ती ही दडपशाहीसाठी नव्हे, तर संरक्षणासाठी आणि न्यायासाठी वापरली जावी. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, प्रत्येक मानव हा सन्मानास पात्र आहे.22 डिसेंबर रोजी आपण गुरु गोविंद सिंह यांची जयंती साजरी करताना आपण केवळ धार्मिक विधी आणि समारंभांपुरते मर्यादित न राहता, त्यांच्या सामाजिक कार्याचा आशय आत्मसात करणे गरजेचे आहे. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांच्या बाजूने उभे राहणे, स्त्री-पुरुष समानतेचा आदर करणे, जात-धर्माच्या पलीकडे जाऊन मानवतेची कास धरणे, हाच त्यांच्या विचारांना खरे अभिवादन ठरेल. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन जर आपण न्याय, समता आणि बंधुतेसाठी सतत कार्यरत राहिलो, तरच गुरु गोविंद सिंह यांच्या विचारांचे खरे स्मरण आणि त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य साध्य होईल.




**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra५@gmail.com


## द्राक्षांचा घोस

द्राक्षांचा घोस
वेलीवर लोंबती
टपोऱ्या मण्यांचे
झुंबर दिसती

गोल आणि लांबट
द्राक्षांचा आकार
काळे नि हिरवे
मुख्य प्रकार

आजी आजोबांना
आवडतात फार
बच्चे कंपनी
करतात पार

वाळवून होतात
मनुका छान
प्रसादात त्यांचा
असतो मान

रसरशीत द्राक्षात
विविध जीवनसत्व
रोज रोज खाऊन
होऊ रोगमुक्त




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106


## खाचखळग्यांची वाट

अवती भवती आता वारं विषारी आलं
पाणी तुंबता सारं डबकं सडून गेलं

सावधान रे मित्रा या खाचखळग्याच्या वाटा
ओढे नाले अडवू पाहे होऊन सागर लाटा

वाटेवर विंचू काळे काट्यासोबत लपले
हसऱ्या चेहऱ्याआड डाव किती रे फुलले

आयुष्याच्या वाटेवर घाट काळ्या पाषाणाचे
उगाच हसे वाटसरूला गोटे नर्मदेचे

ऊन अंगावर सांडता आभाळाचा रंग उडाला
दुष्काळाचा वाण भेटता वादळाचा
तोल सुटला

दंश अंधाराचा खोल काळ्या रात्रीला झाला
काळोखाच्या वाटेवर दिवा एकटा पेटला




**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**
मो. ९४०३३ ८४८८९



**जाहिरात दर**

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

**ADMISSION OPEN**
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903